लोकमत

महाराष्ट्र शासन

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी GRE/TOEFL/ IELTS/ GMAT प्रशिक्षण तयारीकरिता महाराष्ट्र येथे अनिवासी प्रशिक्षण देणे योजनेसाठी अनुसूचित जमातीच्या ४०० उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्याबाबत

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ही एक नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत अनुसूचित जमातीच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाकरिता विविध प्रकल्प, योजना राबविल्या जातात. तसेच अनुसूचित जमातीतील युवक आणि युवतींकरिता विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या ४०० उमेदवारांसाठी GRE/TOEFL/ IELTS/ GMAT प्रशिक्षण तयारीकरिता अनिवासी पूर्व मार्गदर्शन देऊन देशांतर्गत तथा परदेशात अधिकाधिक नोकरीची संधी उपलब्ध व्हावी म्हणून खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देणे योजनेसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन स्वरूपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदत योजनेचा सविस्तर तपशील, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ https://trti.maharashtra.gov.in ला भेट देऊन या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरूनच ऑनलाइन स्वरूपातच अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी निर्धारित केलेल्या लक्षांक पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले तर सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) द्वारे गुणांकन पद्धतीने उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल आणि निर्धारित केलेल्या लक्ष्यांकपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले तर उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतानुसार उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

अनुसूचित जमातीतील उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व CET मधील प्राप्त गुणानुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.

- **अर्ज करण्याचा सुरू दिनांक :- २४.०२.२०२५**
- **अर्ज करण्याचा अंतिम दिनांक :- २४.०३.२०२५**

स्वा/-
(डॉ. राजेंद्र भारूड, भा.प्र.से.)
आयुक्त

[ROC No. 2024-25/क्र.5/C-6583]